महाराष्ट्र शासन
कारागृह व सुधारसेवा विभाग
अपर पोलीस महासंचालनालय व महानिरीक्षणालय,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
दुसरा मजला, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-०१.
फोन क्र.: (०२०) २६१२३५६३ E-mail ID: igoffice.jud-mh@gov.in
फॅक्स क्र.: (०२०) २६१२५८७८ Web Site : mahaprisons.gov.in

# परिपत्रक

**जा. क्र.:** न्यावि/परिपत्रक/बंदी मुलाखत/सर्वसमा./12187/२०२३, कक्ष-९(३), दि.: 27/१२/२०२३.

**विषय: कारागृहातील बंद्यांना देण्यात येणा-या मुलाखत /दुरध्वनी सुविधा/ ई-मुलाखती बाबत.**

**संदर्भ:** १. मुख्यालाकडील परिपत्रक क्र. न्यावि/बंदीमुलाखत/सर्वसमा/७९१९/२०२३, कक्ष-९(३), दि. १५/९/२०२३
२. अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह यांचे पत्र क्र.२१६३७ दि.२५.१२.२०२३.
३. अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचे पत्र क्र.६२३७ दि.२३.१२.२०२३.

**प्रस्तावना:**

कारागृहात दाखल झालेल्या बंदयांना कारागृह नियमावलीतील तरतुदींनुसार त्यांचे कुटुंबियांशी भेट होणेकरीता वेगवेगळया माध्यमांद्वारे 'मुलाखत सुविधा' देण्यात येत आहे. सदर सुविधेत दुरध्वनी सुविधा तसेच ई-मुलाखत व व्हिडीओ कॉन्फरन्सींग तसेच प्रत्यक्ष भेट यांचा समावेश केलेला आहे. सदर परिपत्रकांमध्ये सुसुत्रता असणे गरजेचे आहे. जेणेकरुन बंदी मुलाखत कार्यपध्दतीत तांत्रिक अडचणी निर्माण होणार नाहीत. या करीता बंदींना त्यांचे जवळचे नातेवाईक व इतरांसोबत मुलाखत कक्ष, दुरध्वनी (कॉईन बॉक्स/ स्मार्टकार्ड), प्रत्यक्ष भेट (गळाभेट), वकील भेट, ई-मुलाखत (व्हिडीओ कॉन्फरन्सींग) द्वारे संवाद साधण्याच्या पध्दतीत एकच सर्व समावेशक मार्गदर्शक सुचना / कार्यपध्दती असावी ही बाब मुख्यालयाचे विचाराधीन होती.

त्या अनुषंगाने बंदी मुलाखत/ दुरध्वनी सुविधा/ ई-मुलाखत बाबत या कार्यालयाने दिनांक १५.०९.२०२३ अन्वये निर्गमीत केलेले परिपत्रक अधिक्रमित करण्यात येवून खालील प्रमाणे एकत्रित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत:

**१. मुलाखत कक्ष:**

१) बंद्यांना देण्यात येणाऱ्या मुलाखती हया न्यायाधिन बंद्यांना आठवडयातुन एक वेळा त्यांचे जवळचे नातेवाईक व मित्र यांना महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ मधील प्रकरण क्र. ३१ (पान क्र. ४२७) Facility to Prisoners मधिल नियम क्र. ४ (i) मध्ये तरतुद आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग- चार -अ दिनांक ०६ जानेवारी २०१५ अन्वये सिध्ददोष बंद्यांना प्रत्येक महिन्याला दोन मुलाखती अनुज्ञेय आहेत. परंतु बंदीने कारागृहात दाखल होते वेळी किंवा एक महिन्याच्या आत त्यास भेटीकरीता येणाऱ्या कुटुंबातील नातेवाइक व

एक किंवा दोन मित्रांची नावे कारागृहास लेखी कळविणे आवश्यक आहे. सदरची नावे घेण्याची जबाबदारी अधीक्षकांची राहील. तसेच संबंधीत अधीक्षक यांनी बंदीचे मित्राची खात्री करुनच भेट देण्यात यावी.

२) बंद्यांना त्यांचे नातेवाईकांशी भेट देताना तुरुंग अधिकारी यांनी स्वत: दक्ष राहून आक्षेपार्ह बोलणे, कोणताही गैरप्रकार अथवा नियमबाह्य संदेशाची देवाण-घेवाण होणार नाही याची दक्षता घेण्यात घ्यावी व नियमबाहय कृत्य, हावभाव आढळल्यास ते कारागृह अधीक्षकांच्या निदर्शनास आणावी व योग्य ती कार्यवाही करावी.

त्या अनुषंगाने बंदी मुलाखत ही कारागृह नियमावली नुसार प्रत्येक मुलाखत २० (वीस) मिनीटांपर्यंत असेल. याबाबतची अंमलबजावणी नियमितपणे व काटेकोरपणे करणेत यावी.

३) वरीष्ठ तुरुंग अधिकारी यांनी मुलाखत चालू असलेल्या जागी दिवसातुन एक ते दोन वेळा स्वत: भेटी देऊन नियंत्रण ठेवावे आणि आपल्या भेटीचा वृत्तांत नोंदवही क्रमांक १३ मध्ये नोंदवावा.

४) अधीक्षकांनी दररोज एक वेळा तरी अचानक भेट देऊन मुलाखतीच्या कामावर लक्ष ठेवावे, तसेच या भेटीची नोंद नोंदवही क्र. १२ मध्ये ठेवावी.

५) बंदी मुलाखत कक्षात गैरप्रकार होत असल्याचे आढळून आल्यास अधीक्षकांनी संबंधीत रक्षक व तेथील कर्तव्यावर असलेल्या तुरुंग अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी व वरीष्टांना अहवाल सादर करावा.

६) बॉम्बस्फोट व गुंडटोळीतील बंद्यांच्या भेटीदरम्यान योग्य व लायक अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी.

७) विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांनीही कारागृह भेटीच्यावेळी न विसरता मुलाखत चालू असताना अचानक भेट द्यावी. तेथील मुलाखत नोंदवही काळजीपुर्वक पाहावी व स्वाक्षरी करावी.

८) बंद्याच्या भेटीकरीता आलेल्या नातेवाईकांकडुन अर्ज घेण्यात यावा आणि कारागृहातील बंदीजनांकरीता उपयोगात आणलेली नोंदवही महाराष्ट्र कारागृह नियमावलीतील (Facilities to Prisoners) नियम क्र. ७ मधील विहीत नमुन्यात ठेवण्यात यावी. तसेच सदरची कार्यवाही ई-प्रिझन्स प्रणालीवर कार्यान्वीत करावी. बंदीजनांना मुलाखत कक्षात प्रवेश करण्यापुर्वी व मुलाखत संपल्यानंतर बाहेर पाठवताना बंद्याची सर्वंकष अंग झडती महाराष्ट्र कारागृह नियमावलीतील (Facilities to Prisoners) नियम क्र. ९(६) अन्वये काटेकोरपणे घेणे आवश्यक आहे.

९) भेटीच्या खोलीमध्ये प्रवेश करण्यापुर्वी बंदीजनांच्या नातेवाईकांकडे पिशव्या व इतर वस्तुंसहीत मुलाखत कक्षात प्रवेश देऊ नये.

१०) ज्या बंद्यांची निवड समितीमार्फत खुले कारागृहाकरीता निवड झाली आहे. परंतु सोई अभावी अथवा खुले कारागृह निर्माणाधीन असल्याने अशा बंद्यांना तात्पुरत्या स्वरुपात बंद कारागृहातच दाखल करण्यात आलेले आहे, अशा बंद्यांना शक्य झाल्यास खुले कारागृहातील बंद्यांचे धर्तीवर खुल्या व मोकळया वातावरणात अधिकारी / कर्मचारी यांच्या निगराणी / पर्यवेक्षणाखाली व बंदीच्या नातेवाईकांच्या ओळखीची खात्री करुन व मुलाखतीबाबतच्या तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक त्या नोंदी घेऊन भेट देण्याची कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

११) नातेवाईकांच्या मुलाखतीची वेळ नियमावलीनुसार सकाळी ९.०० ते ५.०० राहील. तथापि, या बाबत आवश्यकतेनुसार वेळेत बदल करण्याचा अधिकार अधीक्षकांना राहील.

**२. दुरध्वनी सुविधा (कॉईन बॉक्स):**

१) महाराष्ट्र शासन जेएमएल-१३१३/प्र.क्र.-२९५/तुरूंग-२ दिनांक १५.०१.२०१५ अन्वये सदर सुविधा सिध्ददोष बंद्यांकरीता सुरू करण्यात आली होती. या कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र.

न्यावि/कॉईन बॉक्स दुरध्वनी सुविधा/२३९६/२२ कक्ष-९ (३) दिनांक २५.०३.२०२२ अन्वये सदर सुविधा न्यायाधिन बंद्यांना सुध्दा पात्रतेचा निकषानुसार सुरू करण्यात आलेली आहे.

२) ज्या कारागृहांत ॲलन ग्रुप स्मार्टकार्ड दुरध्वनी सुविधा उपलब्ध आहे त्या कारागृहातील सर्व बंद्यांना आठवडयातुन दोनदा प्रत्येकी ०६ (सहा) मिनीटापर्यंत दुरध्वनी सुविधा उपलब्ध करुन द्यावी. सदर दुरध्वनी सुविधेसाठी प्रतिमिनीट ०१ (एक) रुपया अनुसार दुरध्वनी खर्चाची वसुली त्यांचे वेतन/खाजगी पैशामधुन करावी. यासंदर्भातील नोंदवह्या अचुक व काटेकोरपणे ठेवण्यात याव्यात.

यामध्ये कुटुंबातील नातेवाईक, मित्र व वकीलांचा देखील समावेश राहील. तसेच यामध्ये ४ नातेवाईक/ मित्र व १ वकीलांचा मोबाईल नंबर देऊ शकतील.

परंतु ज्या कारागृहात ॲलन ग्रुप मार्फत स्मार्टकार्ड दुरध्वनी सुविधा सध्या उपलब्ध नाही अशा कारागृहात तेथील अधीक्षकांनी बंदीसंख्या व उपलब्ध संच या नुसार त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

३) ज्या बंद्यांना दुरध्वनी सुविधा अनुज्ञेय आहे अशा बंद्यांच्या कुटुंबियांच्या दुरध्वनी नंबर कुटुंबियाचे नावे रिचार्ज केलेल्या बिलाची पावती बघुन व पडताळणी करून खात्री झाल्यानंतरच उक्त दुरध्वनी क्रमांकावर दुरध्वनी सुविधा देण्यात येतील. जर बंद्याच्या नातेवाईकाकडे मोबाईल क्रमांकाची पावती उपलब्ध नसल्यास नविन मोबाईल खरेदी करण्याच्या सुचना कराव्यात. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४) अपवादात्मक परिस्थितीत, सुखद किंवा दुःखद प्रसंगी मानवतेच्या दृष्टीकोनातुन सदर महिन्यात अधीक्षक बंदीस त्याचे विनंती नुसार दोन अतिरिक्त कॉलची सुविधा देऊ शकतात. तसेच त्यापेक्षा अधिक कॉलची आवश्यकता असल्यास विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक याबाबत निर्णय घेतील.

## ३. शिक्षाबंद्याच्या कारागृहाबाहेरील १८ वर्षाखालील मुले-मुली व १८ वर्षाखालील नात/नातू/भाऊ-बहीण यांची प्रत्यक्ष भेट (गळाभेट):

कारागृहातील शिक्षाबंद्याची शिक्षा भोगुन पुर्ण झाल्यानंतर त्याच्या कुटुंबातील व्यक्तींनी आणि समाजाने त्यांना स्विकृत करुन आणि त्यांना समानतेची वागणूक मिळावी आणि बंद्यांना आपल्या कुटुंबाबद्दल सहानुभुती व आपूलकी निर्माण होण्याच्या व कारागृह विभागाच्या सुधारणा व पुर्नवसन या ब्रिद वाक्याच उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने शिक्षाधीन बंदी आणि त्याच्या १८ (अटरा) वर्षाखालील मुले-मुली, नात-नातू व भाऊ-बहीण यांची समक्ष भेट घडवून आणणे आवश्यक आहे. जेणेकरुन समक्ष भेटीत बंदी व त्यांचे नातेवाईकांमध्ये सुसंवाद झाल्याने, घरापासून जास्त कालावधीसाठी लांब राहील्याने येणारी निराशा कमी होण्यास मदत होईल. कारागृहातील महिला व पुरुष बंद्यांच्या कारागृह बाहेरील १८ (अठरा) वर्षाखालील मुले-मुली, नात/नातु/भाऊ-बहीण यांची भेट घेण्याची तीव्र इच्छा असते. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी:

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेली मुळ याचिका क्र. १०७/२०१४ मध्ये दि. २३/३/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने महिला शिक्षा व न्यायाधिन बंदी यांच्या १८ (अठरा) वर्षाखालील मुले-मुली यांची महिन्यातुन दोन वेळा दिनांक निश्चित करुन समक्ष भेट देण्यात यावी.

२) महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २००४/प्र.क्र.५३/का-३, दि. ३१/१/२००५ अन्वये माहिला व बालविकास विभागाचे अंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय किंवा अशासकीय निवासी संस्थेत (बालगृह इत्यादी) असलेल्या कारागृहातील महिला बंद्यांचे मुलांची संपर्क अधिकारी असलेल्या परिविक्षा अधिकाऱ्याच्या मदतीने समक्ष भेट घडवून आणवी.

३) शिक्षा बंदी व त्यांची १८ वर्षाखालील मुले व १८ वर्षाखालील नात-नातू व भाऊ बहीण यांची ०६ (सहा) महिन्यातुन एकदा दिनांक निश्चित करुन समक्ष भेट देण्यात यावी.

४) भेटीच्या दरम्यान बंद्याच्या मुलाची / नात-नातू व भाऊ बहीण यांची योग्य पडताळणी करुन सुरक्षेची आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी.

५) बंद्यांचे ०६ (सहा) वर्षे वयापर्यंतच्या मुलांना पालक / आई-वडील (केवळ एकच व्यक्ती) याचे सोबत समक्ष भेट देण्यात यावी. परंतु बंद्याचे ६ ते १८ वर्षे वयापर्यंतच्या इतर मुलांसोबत आलेले इतर पालक / नातेवाईक यांना नियमानुसार मुलाखत कक्षातुनच भेट देण्यात यावी.

६) समक्ष भेटीच्यावेळी महिला / पुरुष बंदी त्यांच्या मुलांना कारागृह उपहारगृहातील वस्तु तपासणी करुन देऊ शकतात.

७) बंद्यांचे वरील नमुद नातेवाईकांना प्रत्यक्ष भेट देण्यापुर्वी ते त्यांचे रक्ताचे नातेवाईकच असल्याची खात्री / पडताळणी योग्य त्या पुराव्यांसह करण्यात यावी.

८) कारागृहात दाखल बंद्यांच्या परराज्यातील नातेवाईकांची अथवा मित्रांच्या मुलाखती बाबतही वरील प्रमाणेच कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

९) तसेच कारागृहातील महिला बंद्यांसोबत असलेल्या लहान मुलांची कारागृह परिसरातील बालवाडीमध्ये त्याचे नातेवाईक प्रत्यक्ष भेट घेऊ शकतात.

**४. बंद्यांना वकील भेटी/मुलाखती बाबतची कार्यपध्दती:**

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जेएलएम-१३१६/प्र.क्र.८(भाग-१) तुरूंग-२ दिनांक १४ जून २०१७ तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ मुंबई येथील जनहित याचिका क्र. ४६/२०१५ व १६७/२०१५ निर्णय दिनांक १ मार्च,२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये वकील भेटीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:

१) वकिलांनी विहीत नमुन्यात भेटीचा अर्ज करावा व त्यासोबत बार असोसिएशनच्या ओळखपत्राची छायांकित प्रत जोडावी. वकीलांनी आपले ओळखपत्राची मुळ प्रत संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांना दाखवणे आवश्यक.

२) वकील भेटीचे अर्ज त्याच दिवशी सकाळी ८.०० ते ९.०० दरम्यान मुलाखत नोंदणी कक्षामध्ये स्विकारले जातील व संगणक प्रणाली वरही नोंदणी केली जाईल.

३) वकील भेटी साठीची वेळ सकाळी ९.०० ते १०.३० अशी राहील.

४) रविवार व कारागृहीन सुटीच्या दिवशी वकील भेट बंद राहील.

५) कारागृह सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन तपासणीच्या अधिन राहून वकीलांना मुलाखत कक्षात प्रवेश देण्यात येईल.

६) याशिवाय बंद्याच्या संबंधित वकीलास दुरध्वनीची सुविधा देण्यात येत आहे.

७) बंद्याच्या वकीलास ई-प्रिझनमध्ये आणि दुरध्वनी सुविधा देण्यात येत असल्याने वकील भेटीची मर्यादा आठवडयातुन चार (४) वेळा पर्यत देण्यात यावी.

**५. इतर शासकीय आस्थापनांमध्ये जसे बाल सुधारगृह, अनाथालये येथील दाखल असलेल्या मुले-मुली यांची कारागृहातील मातांची भेट घडवुन आणणे:**

महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण-२००४/प्र.क्र.-५३/का-३ दिनांक ३१ जानेवारी २००५ अन्वये कारागृहात दाखल झालेल्या महिला बंद्यांपासुन विभक्त झालेल्या मुलांची व मातांची भेट घडवुन आणण्यासाठी सर्व परिविक्षा अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत:

१) कारागृहात दाखल झालेली महिला ही कोणत्याही जिल्हयातील असु शकते. तिची व तिच्या मुलाची भेट घडवुन आणण्याची जबाबदारी परिविक्षा अधिकाऱ्याची आहे. अधीक्षकांकडुन भेटीची तारीख आणि वेळ निश्चित करून कारागृहातील महिलेची व तिच्या मुलाची भेट घडवुन आणतील.

२) कारागृहात दाखल महिलेची व तीच्या मुलाची भेट किमान पंधरा दिवसातुन एक वेळा व्हावी या व्यतीरिक्त आपत्कालीन परिस्थितीमध्ये देखील भेट घडवुन आणण्यात यावी.

३) कारागृहातील पुरुष बंद्याच्या मुलांनाही वरीलप्रमाणे सुविधा अनुज्ञेय राहील.

४) तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे मुलाखत सुविधेचा वापर भेटीसाठी अनुज्ञेय असेल.

**६. ई-मुलाखत / व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे:**

सद्यस्थितीत NIC द्वारे e-Prison हे Software सुरू करण्यात आलेले आहे. त्यामध्ये Administration या Module मध्ये Sub-module - Online Visitor Approval हे देण्यात आलेले आहे. त्याव्दारे प्रत्यक्ष भेट अथवा ई-मुलाखत देतांना खालील सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे:

१) बंद्यांना देण्यात येणारी ई-मुलाखत ही बंद्यांना यापुर्वी देण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळ व संख्येच्या प्रमाणातच (आठवडयातुन एक वेळ) देण्यात यावी. परंतु कोणत्याही परीस्थितीत बंद्यांना ई-मुलाखत किंवा प्रत्यक्ष मुलाखत या पैकी एकच सुविधा देण्यात येईल.

२) मुलाखतीचा हक्क आहे किंवा नाही याबाबत नोंदवही ठेवुन तसा शेरा नोंदविण्यात यावा. एखाद्या बंद्याचा कारागृहीन गैरवर्तणूकमुळे मुलाखतीचा हक्क काही कालावधींसाठी निलंबित केला असेल तर त्याची नोंद घ्यावी.

३) नातेवाईक जेव्हा बंदयांची मुलाखत ऑनलाईन नोंदणी करतात तेव्हा त्यातील माहितीचे सर्व रकाने मध्ये परिपुर्ण माहिती भरणे आवश्यक असेल. तसेच त्यांच्या ओळखीचा पुरावा ऑनलाईन नोंदणी फार्म वर नमुद असणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर मुलाखत ऑनलाईन स्विकारतांना त्यांचे ओळख पुरावा तेथेच तपासुन त्यांना मुलाखत देता येईल. (ओळखपत्र पुरावा मध्ये - आधारकार्ड, पॅनकार्ड व नातेवाईकांची ओळख पटविण्यासाठी रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स ची प्रत असणे आवश्यक राहील.)

४) वकीलांना बंद्यांसोबत प्रत्यक्ष भेटी ऐवजी महिन्यातुन ०४ (चार) वेळा ई-मुलाखत अनुज्ञेय राहील.

५) बंद्याचे नातेवाईक अथवा सहअपराधी इतर कारागृहात दाखल असल्यास त्यांना ई-मुलाखत सुविधा अनुज्ञेय राहील.

६) कारागृहात दाखल असलेल्या भारतीय व विदेशी बंद्यांना त्यांचे परदेशातील मुले-मुली व नातेवाइकांशी ई-मुलाखतद्वारे / व्हिडीओ कॉलिंगद्वारे दोन आठवडयातुन एकदा १५ (पंधरा) मिनिटे संपर्क करता येईल. या करीता त्यांचेकडुन Undertaking घेण्यात यावे. परंतु सदरची सुविधा पाकीस्तानी व अतिरेकी कारवाईत आरोपी असलेल्या बंद्याकरीता असणार नाही.

७) बंद्यांच्या परराज्यातील नातेवाईकांना ई-मुलाखत करीता पडताळणीसाठी त्यांची माहिती ई-मेल किंवा Whatsapp द्वारे मागणी करता येईल.

अपवादात्मक परिस्थितीमध्ये बंद्यास दोन अतिरिक्त दुरध्वनी सुविधा देय केली असून बंद्याच्या नावांवर पीपीसी/ वेजेस नसल्यास दुरध्वनी सुविधा देता येत नसल्यास त्या बंद्यास अधीक्षकांच्या स्तरावर ई-मुलाखत सुविधा देण्यात यावी. मात्र अतिक्ति मुलाखत अपवादात्मक स्थितीत आणि आपात्कालीन कारणासाठीच द्यावी. सरसकट नियमीत स्वरुपात नाही. प्रत्येक अतिरिक्त मुलाखत/ दुरध्वनी नोंद सुस्पष्ट कारणासहीत नोंदवहीत करावी.

न्यायाधिन / शिक्षाबंदी एका कारागृहातुन अन्य कारागृहात शिस्तभंग कारणास्तव वर्ग केल्यास अथवा बंद्याच्या मुलाखतीकरीता ओळख पटविण्यासाठी बंद्याच्या नातेवाईकांनी खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच झडतीमध्ये निशिध्द वस्तु उदा. मोबाईल अथवा तत्सम सुरक्षेस घातक वस्तु आढळल्यास सदर बंदयाविरुध्द नियमाधिन उचित कार्यवाही करावी. असा बंदी ०२ (दोन) महिन्यांकरीता वरील नमुद सर्व सुविधेकरीता अपात्र राहील.

कारागृहातील ज्या बॅरेकमध्ये/ सेलमध्ये अंमली पदार्थ, गांजा, सिमकार्ड, मोबाईल फोन यासारख्या अवैध वस्तु आढळुन आल्यास त्या संपुर्ण बॅरेकमधील सर्व बंद्याची एक आठवडयासाठी दुरध्वनी सुविधा बंद करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

तसेच, बंद्यांच्या मुलाखत बाबतच्या कार्यपध्दतीत शासन, मुख्यालय यांचेकडुन वेळोवेळी केलेले बदल व सुधारीत मार्गदर्शक सुचना लागु राहतील.

अभिताभ गुप्ता

**(अभिताभ गुप्ता)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

**प्रति,**

अधीक्षक, मध्यवर्ती / जिल्हा / जिल्हा खुले कारागृहे (सर्व),
अधीक्षक, रत्नागिरी वि. कारागृह/ संपर्क अधिकारी, स्वतंत्रपूर खुली वसाहत, आटपाडी,
प्राचार्य, किशोर सुधारालय, नाशिक.

**प्रत:** १) मा. प्रधान सचिव, गृह विभाग (अ.व सु.), महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई,
२) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), पुर्व विभाग, नागपूर,
२) कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण/ पश्चिम/ मध्य विभाग, मुंबई/ पुणे/ छ. संभाजी नगर.
४) प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे.